कला अकादमी गोवा
पणजी–गोवा

कअ/हिंसंवि/२०२५–२६/६६०
दि. २३/०६/२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे जागतिक संगीत दिन व जागतिक योग दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली "प्रतिभा" ही मासिक संगीत सभा शनिवार दि.२१ जून २०२५ रोजी कला अकादमीच्या कृष्ण कक्षात संपन्न झाली. सर्व प्रथम हिदुस्थानी संगीत व नृत्य विभागाच्या संचालीका डॉ. सपना नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्याच्या सोबत संगीत विभागाचे इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. सपना नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर सर्वप्रथम कु. उगम सावंत यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी राग बिहाग मध्ये विलंबित ख्याल व त्याला जोडून दृत बंदिश सादर केली. त्यांना श्री भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ व कु. उत्कर्षा फोंडेकर यांची सवादिनी साथसंगत लाभली. तद्नंतर कु. कौशल कवळेकर यांचे तबला सोलो वादन झाले. त्यांनी ताल तिनतालामध्ये तबल्यातील विविध रचना सादर केल्या त्यांना श्री शुभम नाईक यांची नगमासाथ लाभली. तबला वादनानंतर कु. शुभ पार्सेकर यांचे संवादिनी एकलवादन झाले. त्यांनी मध्यलय झपतालात राग यमन सादर केला व त्याला जोडून तिनतालात एक रचना सादर केली. त्यांना श्री. श्रीपाद च्यारी यांची तबला साथसंगत लाभली.

तद्नंतर कु. शिल्पा के., कु. मंजिरी फुटणकर व कु. नेहाली किनळकर ह्या विद्यार्थिनींनी भरतनाटयम् नृत्य सादर केले. त्यांना सौ. मंदिरा तिरोडकर यांची नटवंगमची साथ तसेच विद्वान श्री. डि. आर. चेथनमुर्ती यांची मृदंगमची साथ व डॉ. दिप्ता रुबसुंदरम् यांची गायनसाथ लाभली. शेवटी कार्यक्रमाची सांगता कु. आरुणी प्रभू, कु. साक्षी देशपांडे, कु. तनिशा आमोणकर, व कु. रिध्दिमा वेंगुर्लेकर यांच्या कथ्थक नृत्याने झाली. त्यांना सौ. वरदा बेडेकर यांची पढंतचीसाथ तसेच श्री. प्रज्योत ताम्हणकर यांची तबलासाथ व श्री. शुभम नाईक यांची संवादिनीसाथ लाभली.

या कार्यक्रमासाठी सर्व पालक व रसिक श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्र संचालन सौ. मंदिरा तिरोडकर व कु. कन्या नाईक यांनी केले तर सौ. वरदा बेडेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)